क्रमांक : ६

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## सोमवार,दिनांक ०५ फेब्रुवारी, २०१८/ माघ १६, १९३९ शके

**६. लक्षवेधी सूचना स्वीकारण्याबाबत सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की :-**

1) महाराष्ट्र विधानसभेच्या **सोमवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१८** रोजीपासून विधानभवन, मुंबई येथे सुरु होणाऱ्या **सन २०१८ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय)** अधिवेशनासाठी स्वीकारण्यात येणाऱ्या लक्षवेधी सूचना मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्या निदेशानुसार **MOIS** या संगणक प्रणालीवर **संपूर्णत: ऑनलाईन (online) पध्दतीने शनिवार, दिनांक १७ फेब्रुवारी, २०१८** पासून **सकाळी ११.०० वा. ते सायंकाळी ५.००** वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.

2) लक्षवेधी सूचना **ऑनलाईन (online)** पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने प्रथम दिवशी अवलंबविण्यात येत असलेली बॅलट पध्दत **कायमस्वरूपी** बंद करण्यात येत आहे.

3) महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचनेचा विषय हा निकडीचा, सार्वजनिक महत्वाचा, स्पष्ट, मुद्देसूद व एकाच विभागाशी संबधित असणे आवश्यक आहे. तसेच लक्षवेधी सूचनेचे प्रारूप जास्तीत जास्त १५० ते १७५ शब्दांचे असावे.

4) अधिवेशन संस्थगित होण्यापूर्वीचे कार्यालयीन कामकाजाचे पूर्ण **३ दिवस** अगोदरचा दिवस हा **ONLINE पध्दतीने लक्षवेधी सूचना** स्वीकारण्यासाठी अंतिम दिवस असेल.

5) लक्षवेधी सूचना स्वीकृती संबंधी व स्वीकृत सूचना चर्चेला घेणेसंबंधीचा पूर्ण अधिकार हा **मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचाच राहील**.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ०५ फेब्रुवारी, २०१८.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा

याची प्रत:-

1. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
2. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
3. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव.
4. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील अधिकारी व कक्ष.
5. मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
6. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील पक्ष कार्यालये.
7. मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
8. संगणक कक्ष (WEBSITE)
9. एम.के.सी.एल कक्ष (MKCL)

\\Mls-f1-01\e\2018 FIRST SESSION\Lakshvedhi\Patrak Bhag 2 nd sms.doc